## प्रेसनोट ता. २१/०९/२०२१

### हिंजवडी पोलीस स्टेशनचे तपास पथकाची उल्लेखनिय कामगिरी. पत्नीस अश्लिल शब्द वापरल्याने मित्राने केला मित्राचा खुन सदर खुनाच्या गुन्हयात अज्ञात असलेल्या आरोपीस निष्पन्न करून आरोपी त्याचे मुळ गावी आसाम येथे पळून जाण्याचे तयारीत असताना ४ तासात आरोपीचा कसोशीने शोध घेवून त्यास अटक करून गुन्हा उघडकीस आणला.

हिंजवडी पोलीस ठाणे गुरनं ७०३/२०२१, भादवि कलम ३०२ मधील मयत इसम नामे अच्युत भुयान, वय ३७, रा. स.नं. ४८/०४, सुस रोड, बाणेर पुणे यास अज्ञात इसमाने अज्ञात कारणासाठी डोक्यावर बांधण्याचे फडक्याने गळा आवळून जीवे ठार मारून खुन केल्या बाबत गुन्हा दाखल आहे.

सदर घटनेची खबर मिळताच हिंजवडी पोलीस स्टेशनचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक सो बाळकृष्ण सावंत यांचे मार्गदशनाखाली हिंजवडी पोलीस स्टेशनकडील अधिकारी तसेच तपास पथकातील अधिकारी व अंमलदार, यांनी घटनास्थळाचे आसपाचे उपलब्ध सीसीटीव्ही फुटेज तपासून तसेच साक्षीदार निष्पन्न करून त्यांचेकडे कसुन चौकशी करून आरोपी निष्पन्न करून, तसेच गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या माहीतीचे आधारे गुन्हा दाखल झाल्यावर ४ तासात आरोपी नामे कमल राजन शर्मा, वय १८ वर्षे व ८ महीने, रा. खोली नं. २, सनं ४८/४, नलावडे यांची रूम, सुस रोड, बाणेर, पुणे यास ताब्यात घेवून त्याचेकडे तपास करता मयत इसम हा त्याचा मित्र असून त्याने आरोपीचे पत्नी बाबत अश्लील वक्तव्य केल्याने त्यास कपडयाचे सहाय्याने गळा आवळून ठार केल्याचे कबुल केलेने त्यास अटक करून गुन्हा उघडकीस आणला.

सदरची कारवाई मा.कृष्णप्रकाश सो.पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड, मा.डॉ संजय शिंदे सो, अप्पर पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड, मा.सुधीर हिरेमठ, पोलीस उप-आयुक्त सो, गुन्हे शाखा, पिंपरी चिंचवड मा. मंचक इप्पर, पोलीस उपआयुक्त सो, परि-१ पिंपरी चिंचवड, मा.श्रीकांत डिसले सो, सहा.पोलीस आयुक्त सो, वाकड विभाग वाकड, यांचे मार्गदर्शनाखाली हिंजवडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो,बाळकृष्ण सांवत, पोलीस निरीक्षक सो,(गुन्हे), अजय जोगदंड, सुनिल दहिफळे सो,(गुन्हे) तपास पथकाचे प्रमुख सपोनि,सागर काटे सो, स.पो.नि. देशमुख, म.पो.उ.नि. बोरकर, पोलीस उप-निरीक्षक,समाधान कदम सहा.पो.उप-निरिक्षक बंडु मारणे, पोलीस अंमलदार बाळकृष्ण शिंदे, कुणाल शिंदे, अतिक शेख, रितेश कोळी, शिवराम भोपे, चंद्रकांत गडदे, श्रीकांत चव्हाण, कारभारी पालवे, ओमप्रकाश कांबळे, अमर राणे, दत्ता शिंदे, झनकसिंग गुमलाडु, सुभाष गुरव, यांनी केली आहे.

(मंचक इप्पर)
पोलीस उप-आयुक्त परि-१,
पोलीस आयुक्तालय,पिंपरी चिंचवड.